


# करियरचे ध्येयशिखर

## पत्र क्र. ४

माझ्या लाडक्या हुशार पोरांनो !

या मालिकेतलं पुन्हा एक नविन पत्र ! यात तुमचा अत्यंत जिव्हाळयाचा विषय घेऊन आपण विचार करणार आहोत. तो म्हणजे करीयर ! करीयरची निवड म्हणजे नेमकं काय निवडतो आपण ? ती निवड योग्य प्रकारे कशी करायची हे प्रत्येकाच्याच आयुष्यातील अतिशय महत्वाचे मुद्दे आहेत. या संदर्भात अधिकाधिक माहिती करुन घेतली तर करीयर विषयक निर्णय घेणं सोपं होणार आहे. पर्यायाने मग त्याविषयीचं टेंशनही जाणार आहे आणि मग तुम्ही अगदी आनंदाने आपल्या करीयरच्या ध्येयशिखराकडे वाटचाल करणार आहात. करीयरची निवड करताना आपण विशिष्ट अशा व्यवसायाची व त्यासंबंधीत क्षेत्राची निवड करीत असतो. त्याच बरोबर आपण एका विशिष्ट जिवनशैलीचीही निवड करीत असतो. हे करत असताना आपण आपल्या वेगवेगळया क्षमता व साधनांची सांगड इच्छित व उपलब्ध करीयरशी घालत असतो. त्यासाठीच मग योग्य त्या शिक्षणक्रमासाठी आपला सर्व आटापिटा चालतो.

आज करीयर म्हटलं कि दोन प्रश्न प्रत्येकाच्या डोक्यात प्रथम येतात ते म्हणजे 'सगळयात जास्त स्कोप कुठे आहे ?' आणि 'हल्ली कॉम्पिटिशन एवढी वाढली आहे तिला सामोरं कसं जाता येईल ?' प्रत्येक जण आणि पालक वर्ग सुध्दा या दोन प्रश्नांची उत्तरे आपापल्या परीने शोधण्याचा प्रयत्न करतात. याबाबत आपल्या ठाम अशा काही समजूतीही आहेत. १०वी-१२वीत ८०-९० टक्के पडायलाच पाहिजेत आणि तेवढे मार्क पडले तर सायन्सलाच प्रवेश घ्यायचा आणि डॉक्टर किंवा इंजिनियर व्हायचं ! विचार करण्यासारखी गोष्ट आहे कि ए टू झेड प्रत्येकालाच जर सायन्सला जायचं असेल तर साहजिकच तिकडे कॉम्पिटिशन वाढणार कि नाही ? परंतु सायन्स व्यतिरीक्त इतरही चिक्कार शिक्षण शाखा आहेत आणि त्यांनी पण उत्तमोत्तम करीयर घडू शकते. आपल्या रोजच्या व्यवहारात काय फक्त डॉक्टर-इंजिनियरचीच गरज पडते काय ? नाही पोरांनो ! माणूस प्राण्याला खायला अन्न लागतं, वस्त्र लागतं, चांगला निवारा लागतो ते कुठून येतं ? मग हे सर्व आपल्याला उपलब्ध करुन देतात त्यांना स्कोप नाही काय ? सर्व प्रकारचं शिक्षण जतन करुन ते इतरांना देणाऱ्या चांगल्या नामवंत शिक्षकांना स्कोप नाही काय ? वेळ पडते तेव्हा प्लंबर, वायरमन, इलेक्ट्रिशियनची शोधा शोध करावी लागते मग त्यांना स्कोप नाही काय ? आणि कल्पना करा कि प्रत्येक जण डॉक्टर-इंजिनियर झाला तर जगाचे व्यवहार सुरळीत चालतील का ?

पोरांनो, कधी कधी आपणच आपल्या वाटा बंद करुन टाकतो. आता असं बघा ना कि कितीतरी शैक्षणिक वाटा आज उपलब्ध आहेत आणि अक्षरशः शेकडो करीयर्स देखील उपलब्ध आहेत व नवनविन उपलब्ध होत आहेत. पण आपण मात्र मोजक्या दोन-चार करीयर्सच्या मागेच धावतो. खरं म्हणजे ठरवलं तर वरील दोन प्रश्नांची उत्तरे चुटकी सरशी आपण सोडवू शकतो. एक म्हणजे सर्व जातात तिकडे न जाता वेगळी वाट निवडली तर साहजिकच तिकडे कॉम्पिटिशन कमी असणार आणि प्रत्येक व्यक्ति ही इतरांपेक्षा वेगळी आणि विशेष गुणांनी युक्त असते, त्या गुणांना वाव देऊन त्यांचा विकास केला तर तुमच्या सारखे तुम्हीच असल्याने तुम्हाला नेहमीच स्कोप असणार आहे हो कि नाही ? पण एवढा विचार कोण करतो असंच ना ? शिवाय जिकडे

कमी जातात ती वाट थोडी अवघड पण असणार मग त्या पेक्षा शॉर्ट कट बरा नाही का ? असाच विचार बहुतेक जण करतात.

बरं, असो. आता तिन मित्रांच्या करीयरची एक मजेशीर गोष्ट तुम्हाला सांगतो बघा.

आपल्या महाराष्ट्राला एक अनोखं व धाडशी व्यक्तिमत्व लाभलंय ते म्हणजे श्री. अविनाश धर्माधिकारी ! प्रशासकिय सेवा व करीयरमधलं एक सर्वोच्च शिखर म्हणजे आय.ए.एस. ! कित्येक जण तिथे पोहोचायचं स्वप्न बघतात. ते गाठून सुध्दा काही काळानंतर धर्माधिकारी साहेबांनी नागरी सेवेचा राजीनामा दिला व स्वतःची आय.ए.एस. घडवणारी संस्था पुण्यात काढली. त्यांच्या तोंडून ऐकलेली हि गोष्ट बरंच काही सांगुन जाते.

तिन अगदी जिवलग मित्र असतात. पण तिघांच्याही प्रकृती व प्रवृत्ती भिन्न. पहिला असतो तो एकदम पुस्तकी किडा म्हणतात ना तस्सा ! पहिला नंबर कधी चुकवायचा नाही. दुसरा सर्व साधारण, ना कम ना ज्यादा, कामापुरता अभ्यास करुन दर वर्षी आपला पास होणारा.. तिसरा मात्र एकदम नमुना. उडाण टप्पूपणा करण्यात नंबर वन. सगळया पोरांशी याची दोस्ती पण त्याच्या या दोन खास मित्रांची जर कोणी खोडी काढली तर त्याची काय खैर नाही ! परीक्षेच्या वेळी मात्र त्याची सर्व मदार या पहिल्या स्कॉलर मित्रावर असायची.

त्याच्या मदतीने हा पासींग पुरता आय.एम.पी. प्रश्नांचा अभ्यास करुन कसा बसा पुढच्या वर्गात ढकलला जायचा. झालं. मॅट्रिकनंतर तिघं तिन वाटांना निघून गेले. पहिला झपझप करुन इंजिनियर झाला व आय.ई.एस.ची परीक्षा पास होऊन डायरेक्ट क्लास वन ऑफिसर झाला. दुसरा कला शाखेची पदवी परीक्षा पास झाला, कोणी तरी चांगला गुरु त्याला भेटला आणि आय.ए.एस. परीक्षेची माहिती त्याला मिळाली. त्याने जिव तोडून अभ्यास केला आणि एकदाचा तोही आय.ए.एस. ऑफिसर झाला. तिसरा मात्र फार शिकला नाही. पण ह्युमन इंजिनियरींगची त्याला भारी आवड, सतत माणसं जोडत गेला आणि शेवटी राजकारणात पडला. एक एक पायऱ्या चढत चढत शेवटी एक दिवस तो केंद्रात एका खात्याचा चक्क मंत्री झाला. पोरांनो ! खरी गंमत तर पुढेच आहे. त्याच खात्याचा सेक्रेटरी आपला दुसरा जो आय.ए.एस. ऑफिसर होता तो झाला. आणि त्याहूनही मोठा जोक म्हणजे त्याच खात्यात आपला तो पहिला मित्र जो सगळयात हुशार होता तो एक उच्च पदावर अधिकारी झाला. आता तुमच्या माहितीसाठी सांगतो. तर कोणत्याही खात्याचा मंत्री हा सर्वेसर्वा असतो व तो सांगेल ते निर्णय, आज्ञा त्या खात्याच्या सेक्रेटरीला ऐकणं क्रमप्राप्त असतं. तसंच प्रशासकीय दृष्ट्या त्या खात्याचा सेक्रेटरी हा मुख्य असतो व इतर सर्व अधिकाऱ्यांना त्याच्या आज्ञा पाळणे बंधनकारक असतं. थोडक्यात काय तर नुसतंच पुस्तकी किडा असून किंवा डॉक्टर-इंजिनियर बनून भागत नाही तर इतर गुण असले तर त्याही पुढचं करीयर गाठता येऊ शकतं. पोरांनो, निसर्गाने प्रत्येक व्यक्तीला काहीतरी खास अशा गुण विशेषांची देणगी दिलेली असते तसेच प्रत्येक व्यक्ती हि इतरांपासून वेगळीच असते. त्यामुळे खरं तर दुसऱ्या कोणाशी आपली तुलनाच होऊ शकत नाही. परंतु या गुण विशेषांची जपणूक, वाढ आपण करीत नाही, किंबहुना त्याची जाणिवही आपल्याला नसते. करीयरची निवड करतात सरसकटपणे आपल्यातील अशा गुण विशेषांकडे दुर्लक्ष केले जाते. याउलट जर या गुण विशेषांकडे डोळसपणे पाहिले व त्यांच्याच आधारावर करीयरची निवड केली तर त्या क्षेत्रात खूप प्रगती करु शकतो. अगदी उदाहरणच द्यायचे झाले तर

सचिन तेंडुलकर जर का मेडिकल-इंजिनियरींगला गेला असता व तेथे त्याने जागतिक दर्जा प्राप्त केला असता तरी आज त्याने अब्जावधि क्रिकेट रसिकांना जो आनंद दिला आहे, जेवढी प्रतिष्ठा-प्रसिध्दी त्याने प्राप्त केली आहे व असे करीत असताना जेवढा आनंद त्याने स्वतः मिळवला आहे व शेवटी या सर्वांमुळे जेवढा पैसा त्याने कमवला आहे तेवढा नक्कीच कमवला नसता.

दुसरं उदाहरण म्हणजे एके काळचा 'यंग-अँग्री मॅन' अमिताभ बच्चन ! गेली चाळिस वर्षे त्याने आपल्या कसदार-दमदार अभिनयाने आबाल-वृध्दांच्या मनावर राज्य केले. आणि आज वयाच्या ६९व्या वर्षीसुध्दा वेगवेगळया चित्रपटांच्या व टिवी शोजच्या शुटिंगमध्ये व्यस्त आहे. काहींचा समज असतो कि सचिन किंवा अमिताभची गोष्ट वेगळी आहे. अशी उदाहरणे अपवादात्मकच असतात. परंतु हि समजूतच मुळात चुकीची आहे. प्रत्येक असामान्य व्यक्ति हि काही जन्माने असामान्य नसते. ती असामान्य ठरायच्या आधी सामान्यच असते. त्या व्यक्तिने आपल्या आयुष्यासंबंधी घेतलेले अचूक निर्णय, घेतलेले अथक परीश्रम, जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास, सातत्य व संयम अशी काही स्वभाव वैशिष्ट्ये या सर्वांमुळे ती व्यक्ति असामान्य ठरते. मग जी गोष्ट त्यांना लागु होते तीच गोष्ट आपल्यालाही लागु होऊ शकते. ते जसे यशस्वी झाले तसेच आपणही यशस्वी होऊ शकतो. करीयरची निवड करताना हाच दृष्टिकोन महत्वाचा व निर्णायक ठरतो.

पोरांनो ! तुम्ही म्हणाल ते ठिक आहे हो. पण आम्हाला करीयर कसं निवडायचं याचा रामबाण उपाय सांगा ! तर काय हरकत नाही. तो पण आहे आपल्याकडे. करीयरची निवड पुढील पध्दतीने खमखासपणे करता येईल. मुळात कोणत्याही करीयर मधून आपल्याला पैसा, काम केल्याचं समाधान, प्रतिष्ठा, प्रसिध्दी व मान-सन्मान या गोष्टी प्राप्त होतात. यापैकी मला स्वतःला माझ्या करीयर मधून काय हवं आहे हे प्रत्येकाने बसून ठरवायला हवं. आता माझी आवड किंवा कल असलेल्या करीयरसाठी आवश्यक शैक्षणिक, बौध्दिक, शारिरीक, आर्थिक क्षमता माझ्यामध्ये आहेत का याचा विचार करा. जिवनात सगळंच काही मनाप्रमाणे होईल असं नसतं. अशा वेळी कुठे तरी तडजोड करुन दुसरा पर्याय स्विकारुन त्यानंतर आपण ठरवलेल्या करीयरविषयीचा सखोल अभ्यास, त्यातील फायदे-अडचणी यांची माहिती मिळवा. आपण माहिती तंत्रज्ञानाच्या युगात रहात असल्याने अशाप्रकारची माहिती थोड्याशा प्रयत्नांनी मिळू शकते. अशा प्रकारे कोणतंही करीयर ठरवल्यानंतर अथक परीश्रम, जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास व संयम या गुणांनिशी स्वतःला त्यामध्ये झोकून द्या.

कोणत्याही क्षेत्रात असामान्य यश मिळवण्यासाठी तपश्चर्या केल्याशिवाय फळ मिळत नाही. या वाटेवर कधी-कधी अपयशलाही सामोरे जाण्याची वेळ येते. परंतु स्वतःवरचा विश्वास असेल तर अंतिम यश ठरलेलं आहे.

करीयर मधून पुरेसा किंवा भरपूर पैसा मिळवणे यात अगदी काहीही वावगं नाही. कारण, आयुष्यात चांगली कामं करायची म्हटली तरी पैसा लागतोच आणि पैशाला अजिबात दुसरा पर्याय चालत नाही. असं असलं तरी पैसा हे उद्दिष्ट ठेऊन जेव्हा आपण करीयरची निवड करतो त्यात थोडीशी गल्लत होते. कारण जगात पैशापेक्षाही काही मौल्यवान गोष्टी आहेत

ज्यांच्याकडे पैशांवर लक्ष केंद्रित झाल्यामुळे दुर्लक्ष होतं. आता पुन्हा काही गोष्टी सांगाव्याशा वाटतात. पहिली गोष्ट भारतातील विख्यात मॅनेजमेंट गुरु श्री. अरिंदम चौधरी यांनी त्यांच्या पुस्तकात सांगितली आहे. मध्यंतरी अमेरीकेतील करोडपती लोकांचं एक सर्वेक्षण, करण्यात आलं होतं. यात असं आढळून आलं कि फक्त एकच टक्का लोकांनी करोडपती व्हायचं ठरवलं होतं आणि ते झाले. पण यातल्या ९९ टक्के लोकांनी आपापल्या गुण विशेषांना अनुसरुन आवडीचं करीयर निवडलं, त्यात त्यांनी असामान्य कामगिरी केली आणि त्यामुळे त्यांनी अमाप पैसा कमवला व ते करोडपती झालेत.

तुम्ही सर्वांनी 'थ्री इडियटस्' हा चित्रपट पाहिलाच असेल यात आमिर खानने म्हटलंय 'काबिल बनो, कामयाबी तो झक मारके तुम्हारे पास चलके आती है' ! पोरांनो ! हे अगदी १०० टक्के खरं आहे. आपल्यातील नैसर्गिक गुणवत्तेचा विकास केला, कौशल्ये आत्मसात केलीत तर यश मिळतंच.

'थ्री इडियटस्' विषयी अजून सांगण्यासारखं म्हणजे हा चित्रपट ज्या कादंबरीवरुन बनवण्यात आलाय तिचा लेखक चेतन भगत याने आय.आय.टी. दिल्लीहून पदवी घेतल्यानंतर तितक्याच नामांकित आय.आय.एम. अहमदाबादहून मॅनेजमेंटची पदवी घेतलेली आहे. अकरा वर्षे हाँगकाँगमध्ये 'बँकर' चं काम केल्यानंतरही त्याच्यातला लेखक काही त्याला स्वस्थ बसू देत नव्हता. शेवटी तो नोकरी सोडून मुंबईला आला व त्याची एका पाठोपाठ तीन-चार पुस्तकं भारतात बेस्ट सेलर म्हणून मान्यता पावली आहेत.

एवढंच नव्हे तर साधं बी.ए. चं शिक्षण घेतलेल्या जे. के. रोलिंग या बाईनं भुता-खेतांच्या गोष्टी लिहून अख्ख्या जगाला वेड लवलं. त्यातून त्या बाईनं कोटयावधी रुपयांची कमाईपण केली आहे.

मार्क झुकरबर्ग हा अवघ्या २७ वर्षांच्या तरुणाला साधं कॉलेज पण पूर्ण करता आलं नाही, पण त्याने 'फेसबुक' ची निर्मिती करुन सर्वात तरुण अब्जाधिश बनण्याचा मान पटकावला आहे. यावरुन हेच नाही का सिध्द होत कि तुमच्या नैसर्गिक शक्तिला चालना दिली तर त्यातून अफाट यश मिळू शकतं. भारतासारख्या प्रचंड आर्थिक विषमता असणाऱ्या देशात खूप मोठ्या संस्थेने लोक आजही दारीद्रय रेषेच्या खाली जिवन जगतात, अशा स्थितीत व्यक्तिगत आवडीनुसार करीयरची निवड बऱ्याचदा शक्य नसते, परंतु मनात स्वप्नं असेल आणि त्याचा पाठलाग करण्याची प्रचंड इच्छाशक्ती असेल तर अशी स्वप्नेही वास्तवात येऊ शकतात. पोरांनो, तुम्ही आम्ही त्यामानाने लकी आहोत पण दिल्लीचा राजेश सिंगची गोष्ट खरोखरीच सगळयांसाठी प्रेरणादायी आहे.

मघाशी उल्लेख केलेली आय.ए.एस. ची परीक्षा भारतातील एक नंबरची कठिण पण तितकीच मानाची परीक्षा आहे. सर्व प्रथम चाळणी परीक्षा, मग सविस्तर मुख्य परीक्षा आणि त्यानंतर व्यक्तिमत्व चाचणी अर्थात मुलाखत असे या परीक्षेचे स्वरुप आहे. भल्याभल्यांना हि परीक्षा पास होता होता नाकी नऊ येतात. परंतु राजेश सिंग ह्या दिल्लीच्या युवकाने दोन वर्षापूर्वीच हि परीक्षा पास केली आहे. विशेष म्हणजे राजेश दोन्ही डोळयांनी अंध आहे.

राजेश काही जन्मापासून अंध नाही. काही कारणांनी अचानक त्याची दृष्टि गेली. या

गोष्टीचं त्याच्यापेक्षा त्याच्या आई-वडिलांनाच जास्त दुःख झालं. त्यांना चिंता पडली आता याचं कसं होणार ? पण राजेश हिंमत हारला नाही. त्याने हळुहळु आपलं शिक्षण पूर्ण केलं. मग त्याने आय.ए.एस. ची परीक्षा देण्याचा अतिशय धाडशी निर्णय घेतला. इथेही त्याच्या आई-वडिलांनी फारशी साथ दिली नाही. तरीही त्याने आपली जिद्द सोडली नाही, त्याने अभ्यासाला सुरुवात केली आणि प्रयत्नांची पराकाष्ठा करुन एक दिवस तो हि परीक्षा पास झाला. त्यानंतरही त्याला एका वेगळयाच लढाईला तोंड द्यावं लागलं. तो अंध असल्याचं कारण दाखवून त्याला सेवेपासून वंचित ठेवण्यात आलं. शेवटी कोर्टात लढा देऊन त्याने हि लढाई जिंकली.

पोरांनो ! करीयरच्या असंख्य वाटा आहेत, पण आपल्याला कोणत्या वाटेने जायची इच्छा आहे, ती वाट आपल्याला कितपत झेपेल, पेलवेल याचा सारासार विचार व अभ्यास केला तर करीयरची निवड करणं काही अवघड नाही.अरे, हो ! एक काय, काही दोन चार एक्सायटिंग करीयर्स्ची तोंड ओळख करुन द्यायची राहिलीच कि !

तुम्ही कल्पक असाल, तुमच्याकडे रिस्क घेण्याची जिगर असेल तर, तुम्हाला कोणी हुकूम केलेलं आवडत नसेल, तुम्हाला तुमच्या मनाने काम करायची इच्छा असेल व खूप मोठी मोठी तुमची स्वप्ने असतील तर उद्योजक बनायला तुम्ही अगदी फिट्ट आहात. त्यासाठी कोणता उद्योग करायचा त्याचं सखोल ज्ञान मात्र तुम्हाला घ्यायला हवं आणि उद्योगाचं गणित पण समजून घ्यावं लागेल. आज मराठी उद्योजक पण खूप चांगली कामगिरी करत आहेत. मराठी माणूस उद्योग-धंदा करु शकतो हे त्यांनी सिध्द केलंय.

मध्यंतरी आपल्या अण्णा हजारेंनी सरकारला कसं धारेवर धरलं होतं माहित आहे ना ? नुकतंच थोर समाज सेवक बाबा आमटेंच्या सहधर्मचारिणी व तपस्विनी साधनाताई आमटे यांच निधन झालंय. बाबा आमटे काय किंवा साधनाताई काय आणि अण्णा हजारे काय या लोकांनी निःस्वार्थ भावनेने समाज सेवेचं व्रत स्विकारलं, त्यासाठी त्यांनी आपलं संपूर्ण आयुष्य वेचलं, मला सांगा त्यांना काही कमी पडलं का ? त्यांच्या आनंदात व सुख समाधानात काही कमी झाली का ? नाही ना ? मग हेही एक करीयर होऊ शकतं नाही का ? किंबहुना कोणी ना कोणी हे करायलाच हवं. चांगल्या सुनियोजित गैर सरकारी सामाजिक संस्था आपण स्थापन करु शकतो.

आपण उठ सूठ राजकारण्यांना दोष देतो, त्यांच्या पात्रतेविषयी आपल्याला चिड येते मग राजकारणाचा दर्जा वाढवण्यासाठी चांगल्या माणसांनी राजकारणात का येऊ नये ?

शिक्षण संस्था व त्यांच्या चालकांच्या नावानेही आपण ओरड करत असतो, मग आपल्याला हव्या तशा शिक्षण संस्था चालवण्यासाठी आपण का पुढे येऊ नये ? पोरांनो, विचार करा, या ही करीयर्सचा विचार नक्की करा ! एक करीयर म्हणून जे जे काही अपेक्षित असतं ते ते सर्व काही या ही करीयर्स्मध्ये तुम्हाला मिळेल.

आज जागतिक पटलावर अनेक भारतीय मोठमोठ्या कंपन्यांच्या वरीष्ठ पदांवर यशस्वी कामगिरी करत आहेत. आपले विक्रम पंडित अमेरीकेच्या सीटी बँकेच्या सीईओ या पदावर आहेत. त्यांची वार्षिक कमाई काही शेकडो कोटी रुपयांच्या घरात आहे.

नुकतीच एक बातमी वाचण्यात आली आहे कि विख्यात भारतीय चित्रकार तय्यब मेहता

यांच्या चित्राला तब्बल साडे पाच कोटी रुपयांची किंमत मिळाली आहे. क्रिडा क्षेत्रातील किती खेळाडू घसघशीत कमाई करीत आहेत. मनोरंजनाच्या क्षेत्रातही अशी कितीक उदाहरणे सांगता येतील.

शिवाय आयुष्याच्या कोणत्याही टप्प्यावर आपल्याला जाणवलं कि अरे आपण तर वाट चुकलो तर योग्य प्रयत्नांनी नवी वाट चालणंही शक्य असतं. उदाहरण द्यायचं झालं तर याआधी आपण चेतन भगतची गोष्ट वाचलीच आहे.

शेवटी एक अतिशय महत्वाची बाब सांगतो. आपण एखाद्या गाडीत बसल्यावर कुठे जायचं ते ठरवू शकतो का ? नाही ना ? ते आपल्याला गाडीत बसायच्या आधी किंबहुना घरुन निघतांनाच ठरवावं लागेल. तसंच १०वी-१२वीचा निकाल हाती पडल्यावर कुठे जायचं ते ठरवल्यास मेरीट जिकडे घेऊन जाईल तिकडे आपल्याला जावं लागेल आणि पश्चाताप करण्यावाचून दुसरं काही आपल्या हातात नसेल. मग त्यापेक्षा कोणतं करीयर करायचं याची आखणी-निश्चिती आताच करा आणि त्यानुसार जिवतोड मेहनत केली तर मनासारखं ड्रिम करीयर नक्कीच घडवता येईल. मदतीला भारु काका आहेच ! हो कि नाही ?

सो गेट सेट रेडी आणि गो... बेस्ट ऑफ लक, नेहमी साठीच !

पुन्हा भेटूच !

जयहिंद ! जय महाराष्ट्र !!!

तुमचा लाडका

भारु काका.

पोस्ट बॉक्स नं. 274, कल्याण (प). जि. ठाणे – 421301
मो. 08652340256 इमेल : bharukaka2011@yahoo.com वेबसाईट : www.bharukaka.com

# पत्राचे सार व कृती

पत्र क्र. ४

* सगळे जातात तिकडे न जाता करीयरची निवड आपला नैसर्गिक कल ओळखून केली तर करीयर मध्ये असामान्य यश मिळवता येते.
* आपण माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात आहोत, वेगळ्या करीयर्सची किंवा आपल्या आवडीच्या करीयरची माहिती मिळवून त्यातील फायद्या-तोटयावर विचार करायला हवा.
* आज करीयरच्या असंख्य वाटा उपलब्ध आहेत. त्यातील आपल्या सोयीची वाट आपण निवडायला हवी.

कृती

* वेगवेगळ्या करीयर्सची माहिती मिळवा.
* आपल्यातील क्षमता व आपली आवड यांची सांगड घालून करीयरची निवड करा. त्यासंबंधीची माहिती विविध माध्यमांमधून प्राप्त करा.
* शक्य असल्यास आपली कल चाचणी करुन तज्ञांचा सल्ला घ्या.
* आपले शिक्षक, पालक व सूज्ञ मंडळींसमवेत तुमच्या करीयर विषयी चर्चा करा व त्यांचा सल्ला घ्या.
* समजा एका क्षेत्रात प्रवेश मिळाला नाही तर दुसरा पर्याय तयार ठेवा.

***